**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. ४ तर्फे विद्वान वकील श्री. एस. बी. पांडे यांचेमार्फत शपथेवर पुढे सुरुः–</u>**

६. मला बेलकुंड येथे जमिन आहे. सदर जमिनीचा क्रमांक ३७७ आहे. माझी जमिन वाद जमिनीपासून १ कि.मी लांब आहे. माझी जमिन मारूती महाराज साखर कारखान्या समोर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमिनीच्या पुर्व बाजुला बेलकुंड गाव आहे. वाद जमिन टाका पाटीजवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद जमिन माझ्या जमिनीच्या पश्चिम–दक्षिण बाजुला आहे. मी बेलकुंड येथे राहतो. मी तुळजापूर रस्त्याने माझ्या शेताकडे जातो. देशमुख कुटूंबाची टाका पाटी येथे गट क्र. ३०२ आहे. त्या व्यतिरिक्त त्यांच्या कुटूंबाकडे किती जमिनी आहेत हे मला माहित नाही.

७. मला न्यायालयाचे साक्षी समन्स आले होते. आता सदरचे समन्स माझ्या घरी आहे. मी ते समन्स या कामी दाखल करू शकतो. आज मला वादीने साक्ष देण्यासाठी बोलावले आहे. वादीने मला गटाच्या चतु:सिमा सांगितल्या, त्या शिवाय इतर काही सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीने सांगितल्याप्रमाणे मी साक्ष देत आहे.

८. गट क्र. ३०२ चे क्षेत्र मला माहित नाही. गट क्र. ३०२ हा एकाच टुकडयात आहे. गट क्र. ३०२ मी प्रत्यक्ष २५ वर्षापुर्वी बघितला होता. त्यानंतर मी गट क्र. ३०२ पाहिला नाही. गट क्र. ३०२ च्या पुर्वेस रस्ता, पश्चिमेस ताऊस्याच्या मधुकरराव यांची

जमिन, दक्षिणेस दोन–तिन देशमुख भावांची जमिन आहे. नेमकी कोणाची आहे ते माहित नाही. गट क्र. ३०२ च्या उत्तरेस दत्तु कांबळे यांची जमिन आहे. या चतु:सिमेतील जमिनीचे एकुण क्षेत्र किती आहे हे मला आता सांगता येणार नाही. वादीचे वडील व त्यांच्या भावांमध्ये वाटण्या झाल्या किंवा नाही याची मला माहिती नाही. कोणा कोणाला किती जमिन होती याची माहिती मला नाही. गट क्र. ३०२ मध्ये मधुकरराव व काशीराव यांच्यामध्ये सन २००१ मध्ये वाटणी झाली होती. सदरची वाटणी लेखी किंवा तोंडी झाली याची माहिती मला नाही. कोणाला कोणत्या बाजुची जमिन आणि किती जमिन आली हे मला माहित नाही.

९. मी प्रतिवादी क्र. ४ यास ओळखतो. तो टाका येथे राहतो. काशीराव याने नामदेव दौलाला जमिन कधी विकली व किती विकली हे मला माहित नाही. नामदेव याचे खरेदीखत मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे कोणत्या चतु:सिमेमधील जमिन नामदेव याला विकली हे मला माहित नाही. अभय याने प्रतिवादी क्र. ४ यास जमिन विकली त्या खरेदी खताच्या वेळेस मी हजर नव्हतो. अभय याने प्रतिवादी क्र. ४ यास रक्कम रूपये ६०,०००/– ला जमिन विक्री केली. सदर जमिनीचे क्षेत्र व चतु:सिमा मला माहित नाही. साक्षीदार पुन्हा सांगतात की, खरेदी खताच्या वेळेस मी हजर होतो. पुर्वी औसा–तुळजापूर हा डांबरी रस्ता ५०–६० फुटाचा होता. हे म्हणणे खरे आहे की, आता सदरचा रस्ता १०० फुट सिमेंटचा झालेला आहे. रस्ता रूंदीकरणामध्ये कोणा कोणाच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्यांची नावे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच कोणा कोणाच्या

किती जमिनी गेल्या हे मला सांगता येणार नाही. माझ्या समक्ष २००१ साली काशीराव व मधुकरराव मध्ये वाटणी झाली व खरेदीखत झाले. वाटणी लेखी झाली किंवा तोंडी झाली याची माहिती मला नाही. तसेच वाटणीची तारिख किंवा महिना मला माहित नाही. कोणाला किती जमिन वाटुन दिली हे मला माहित नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ४ याची वादग्रस्त जमिनीमध्ये १९९० पासून विट भट्टी आहे. त्या ठिकाणी प्रतिवादी क्र. ४ यांनी बोअर पाडला आहे किंवा नाही याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ४ चे त्या ठिकाणी घर आहे. गट क्र. ३०२ मध्ये मनोज पाटील यांची जमिन आहे किंवा नाही याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सय्यद लाला याचा विट भट्टीच्या पुर्वेस रस्त्याला लागुन ढाबा होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या ढाब्याची जमिन प्रतिवादी क्र. ४ ने लाला यास विकली होती. प्रतिवादी क्र. ४ याने विट भट्टीच्या पश्चिमेकडील जमिन मनोज पाटील यास विक्री केली होती किंवा नाही याची माहिती मला नाही. प्रतिवादी क्र. ४ यास काशिराव याने विट भट्टीची जमिन २० ते २५ वर्षापुर्वी तोंडी दिली होती. त्यावेळेस मी त्याठिकाणी हजर होतो. सदर जमिन प्रतिवादी क्र. ४ यास काशिराव याने, प्रतिवादी क्र. ४ गरिब असल्यामुळे त्यास खायला दिली होती. सध्या प्रतिवादी क्र. ४ याचा विट भट्टीच्या जमिनीवर ताबा आहे किंवा नाही याची माहिती मला नाही. मला सदर जमिनीबाबत २५ वर्षापुर्वीची माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरून काशिराव याने प्रतिवादी क्र. ४ यास खायला जमिन दिली

असे सांगतो आहे. हे म्हणणे खरे नाही की, विट भट्टीची जमिन व रस्त्यासाठी संपादित झालेली जमिन प्रतिवादी क्र. ४ च्या मालकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र. १ ते ३ व त्यांच्यातर्फे वकील यांना पुकारले असता गैरहजर म्हणुन प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे उलटतपास नाही.**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.10.30 11:15:52 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–२८.१०.२०२५. दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.